ULHASNAGAR MUNICIPAL CORPORATION
उल्हासनगर महानगरपालिका

दुरध्वनी क्र :- ०२५१ - २७२०११९ विस्तार क्र :- २३९ फॅक्स :- ०२५१ - २७२ ०१०४

## जाहिरात

१) मा. राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र, मुंबई यांनी दिलेल्या सूचनानुसार उल्हासनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२२ साठी तयार केलेली प्रारुप प्रभाग रचना दिनांक ०१/०२/२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर प्रारुप प्रभाग रचनेवर हरकती व सूचनांसाठी दिनांक ०१/०२/२०२२ ते १४/०२/२०२२ दुपारी ०३:०० वा. पर्यंत कालावधी देण्यात आला होता. सदर कालावधीत प्राप्त झालेल्या सूचना व हरकतीनुसार दिनांक २३/०२/२०२२ रोजी सुनावणी देण्यात येणार आहे.

**२) सुनावणीचे स्थळ :- शहिद जनरल अरुण कुमार वैद्य सभागृह ( टाऊन हॉल ) उल्हासनगर-३ वेळ १०:३० पासून**

३) लेखी हरकती व सूचना उपस्थित केलेल्या नागरीकांकरिता सुनावणीसाठी दिनांक २३/०२/२०२२ रोजी निश्चित करण्यात आलेली आहे त्यानुसार हरकतदारांची दिनांक २३/०२/२०२२ रोजी सकाळी १०.३० पासुन सुनावणी सुरु होणार असुन सुनावणी संपेपर्यंत आयोजन करण्यात आलेले आहे. एका दिवसात सुनावणी प्रक्रिया पूर्ण न झाल्यास पुढील सुनावणी दुसऱ्या दिवशी दि. २४/०२/२०२२ रोजी सकाळी १०.३० वा. घेण्यात येईल. सदर सुनावणीचे नियोजन खालील प्रमाणे करण्यात आलेले आहे:-

| हरकतीचे स्वरुप | आक्षेप | वेळ |
|---|---|---|
| अ (हद्दीबाबत) | २२५ | १०:३० ते ०१:३० |
| ब (वर्णनाबाबत | १३६ | ०२:३० ते ०४:०० |
| इ (इतर सामान्य हरकती) | ४७ | ०४:१५ ते सूनावणीची कार्यवाही संपेपर्यंत |

**आक्षेपदार निहाय सविस्तर वेळापत्रक उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.**

### सर्व साधारण सुचना

अ) सदर वेळापत्रक सर्व प्रभाग समिती कार्यालय, उल्हासनगर महानगरपालिका (मुख्यालय) येथे प्रसिध्द करण्यात येत आहे.

ब) आक्षेपदारास टपालाद्वारे सुध्दा नोटीस बजावण्यात येत आहे.

क) आक्षेपदाराने वरील नमुद ठिकाणापैकी नजिकच्या ठिकाणी जाऊन आपले नोटिसीची वेळ तपासुन त्या अनुषंगाने सुनावणीला उपस्थित राहण्यास विनंती करण्यात येत आहे.

**टिप :-** लेखी सूचना व हरकती उपस्थित केलेल्या नागरीकांना सुनावणीची नोटीस बजावण्यात येणार आहे. सदर सुनावणीच्या नोटीसमध्ये नमूद केलेल्या वेळेच्या अर्धातास आधी संबंधित हरकतदाराने किंवा त्यांच्या प्रतिनिधीने उपस्थित रहावयाचे आहे.

१८/२/२०२२

(डॉ. राजा दयानिधी भा.प्र.से.)
आयुक्त
उल्हासनगर महानगरपालिका